श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या कु. सेजल सुतार हीची निवड

श्री व्यंकटेश महाविद्यालयातील कु. सेजल सुनिल सुतार हीची अखिल भारतीय आंतर-विदयापीठ योगासन महिला स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघामध्ये निवड झाली असून महाविद्यालयातर्फे तिचे अभिनंदन करण्यात आले. या स्पर्धा भुवनेश्वर येथील कलिंगा इन्स्टिटट्यूट ऑफ इंडस्ट्रियल टेक्नॉलॉजी विद्यापीठामध्ये स्पर्धा होणार आहेत. " कु. सेजलच्या या यशासाठी तिची जिद्द, मेहनत, चिकाटी तर महत्वाची आहेच पण तिचे योगावर असलेले प्रेम, प्रामाणिकपणा व समर्पण तितकेच महत्त्वाचे आहे." असे मत सत्कार कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी व्यक्त केले. तसेच महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार यांचे मार्गदर्शन देखील तिच्या यशासाठी मोलाचे ठरले आहे.  संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोहरा, चेअरमन श्रीकृष्णा बोहरा व संस्थेचे सचिव श्री. बाबासाहेब वडिंगे, महाविद्यालयाचे प्राचार्य, शारीरिक शिक्षण संचालक व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कडून सेजलच्या मिळालेल्या यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कु. सेजलच्या या यशामुळे श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखली गेली.

